**जळगाव जिल्ह्यातील भुसावळ, चोपडा, यावल, पाचोरा, भडगांव, मुक्ताईनगर व अमळनेर तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांकरिता (एकूण १२) दि.१९/०५/२०२१ रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

जळगाव जिल्ह्यातील खालील तक्त्यात नमूद केलेल्या भुसावळ, चोपडा, यावल, पाचोरा, भडगांव, मुक्ताईनगर व अमळनेर तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांकरिता (एकूण १२) पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि.१९/०५/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव येथून व्हिडिओ कॉन्फरसिंग द्वारे घेण्यात आली.

| अ. क्र. | प्रस्तावित वाळू घाटाची ठिकाणे | तालुका |
|---|---|---|
| १ | जोगलखेडा | भुसावळ |
| २ | बेलव्हाय भाग-१ | भुसावळ |
| ३ | बेलव्हाय भाग-२ | भुसावळ |
| ४ | पिंप्री | चोपडा |
| ५ | सुटकार | चोपडा |
| ६ | कोळंबा | चोपडा |
| ७ | थोरगव्हाण | यावल |
| ८ | परधाडे | पाचोरा |
| ९ | वडधे | भडगांव |
| १० | भोकरी | मुक्ताईनगर |
| ११ | रुंधाटी भाग-२ | अमळनेर |
| १२ | हिंगोणेसिम भाग-१ | अमळनेर |

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. BO/JD (WPC)/PH/B-२१०५१०-FTS-००४४ दि. १०/०५/२०२१ अन्वये सदरच्या लोकसुनावणीसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

१) जिल्हादंडाधिकारी, जळगांव - अध्यक्ष
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अंतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - सदस्य
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक

३) उप-प्रादेशिक अधिकारी, - समन्वयक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव

सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१) मा. अभिजित राऊत, भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी, जळगांव

२) डॉ. प्रविण जोशी,
प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक- (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे)

३) श्री. सो. म. कुरमुडे
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव

श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष, तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, महसूल विभागाचे अधिकारी व जळगांव जिल्हयातील व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित नागरिकांचे स्वागत केले. तसेच समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्यात आली.

सर्वप्रथम समन्वयक यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१४/०९/२००६ व सुधारीत दि.०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

जळगांव जिल्हयातील १२ वाळू घाटांमधून वाळूचा उपसा करण्याकरीता प्रकल्प प्रर्वतक अप्पर जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दि.०८/०४/२०२१ रोजी रितसर शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक यांनी असे नमूद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणा व त्या अनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे.

म.प्र.नि. मंडळाकडे लोकसुनावणी घेण्याबाबत प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या परवानगीने दि.१९/०५/२०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता पर्यावरण विषयक लोकसुनावणी आयोजीत करण्याबाबत निश्चित करण्यात आले. नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि.१५/०४/२०२१ रोजीच्या मराठी दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक द टाइम्स ऑफ इंडिया मध्ये सदरच्या लोकसुनावणीबाबत सुचना प्रकाशित करण्यात आली होती. तसेच प्रकल्पाधारकाने प्रस्तावित प्रकल्पाच्या सादर केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल / पर्यावरण व्यवस्थापन योजना व कार्यकारी सारांश (मराठी व इंग्रजी) यांच्या प्रती खालील शासकीय कार्यालयामध्ये इच्छिुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता ठेवण्यात आल्या होत्या.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.
२) जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव.
३) जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव.
४) तहसिल कार्यालय, भुसावळ, चोपडा, यावल, पाचोरा, भडगांव, अमळनेर व मुक्ताईनगर.
५) उप-विभागीय कार्यालय, भुसावळ, फैजपूर, पाचोरा व अमळनेर.
६) ग्रामपंचायत कार्यालय, जोगलखेडा, बेलव्हाय, पिंप्री, सुटकार व कोळंबा, थोरगव्हाण, परधाडे, वडधे, भोकरी, रुंधाटी व हिंगोणेसिम.
७) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव, हॉल ए, तिसरा मजला, जुने बी. जे. मार्केट,जळगांव – ४२५००१.
८) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, त्रबंक रोड, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.

९) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.
१०) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
११) पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळ मजला, इस्ट विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाइन्स, नागपूर-४४०००१.

तद्नंतर जळगांव जिल्हयातील १२ वाळू घाटांबाबत श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सविस्तर अहवाल सादर केला. तसेच वाळू उपसा करतांना प्रदूषण नियंत्रण करतांना घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

सादरीकरणांनतर समन्वयक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे या प्रस्तावित प्रकल्पाबाबत त्यांचे मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना मांडण्याबाबत आवाहन केले. तसेच त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्तावित प्रकल्पाबाबत एकही लेखी निवेदने प्राप्त झालेले नाही असे सांगितले. उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | **श्री. उमेश सोनवणे, थोरगव्हाण** – मौजे थोरगव्हाण गावालगतच्या वाळू घाटाचा कोणता गट नं. व किती ब्रास असेल. | **जिल्हा खनिकर्म अधिकारी** – मौजे थोरगव्हाण गावालगत (तापी नदी पात्रालगत) गट नं. १ व २ हा वाळू घाट असून त्यातून ३५५७ इतके ब्रास वाळू उपसासाठी राहील. |
| २ | **श्री. शशिकांत पाटील, सरपंच, परधाडे** – आमच्या गावाजवळील गिरणा नदी पात्रातील वाळू ठेका जाईल तर गावासाठी संरक्षण भिंत डीपीडीसी अतंर्गत मंजूर होईल का ? | **जिल्हा खनिकर्म अधिकारी** – सदरचा प्रश्न हा पर्यावरण संबंधीत नसून फक्त पर्यावरण विषयक प्रश्न उपस्थित करावे.<br>**उपविभागीय अधिकारी, पाचोरा** – आपल्या ग्रामपंचायतमार्फत संरक्षण भिंतीचा ठराव मंजूर करुन त्याबाबतचा प्रस्ताव उप विभागीय कार्यालयास पाठवावे व ती विशेष बाब म्हणून मा. आमदार साहेब किंवा उपजिल्हाधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवू, असे सांगितले. |
| ३ | **श्री. कदमसिंग पाटील, जि. प. सदस्य** – मौजे परधाडेचा वाळू ठेका झाला तर त्याचा गावाला किती लाभ मिळेल ? | **जिल्हा खनिकर्म अधिकारी** – नविन वाळू नियोजन धोरणानुसार २५%, २०% व १५% अशी निर्धारित केलेली रक्कम ही ग्रामपंचयातला विविध विकास कामांसाठी देण्यात येते.<br>१ कोटीपर्यंत - २५%<br>१ ते २ कोटीपर्यंत - २०%<br>२ ते ५ कोटीपर्यंत - १५%<br>— जिल्हा खनिज प्रतिष्ठाण योजना |
| ४ | **श्री. कदमसिंग पाटील, जि. प. सदस्य** - २-३ वर्षापूर्वी बहुडेश्वर गावालगतचा वाळूचा घाट लिलाव झालेला होता. परंतु त्याचा गौणखनिजची रक्कम अद्यापपर्यंत मिळालेली नाही. | **जिल्हा खनिकर्म अधिकारी** – वाळूचे नविन धोरण तयार करण्यात आलेले असून नवीन तरतूदी समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत, पूर्वी अश्या रकमा मिळत नव्हत्या |

| अ. क्र. | नाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| ५ | **श्री. चंद्रकांत सोनवणे, सुटकार** – मौजे सुटकार गावालगतच्या वाळू घाटाचा लिलाव कधीपर्यंत होईल व वाळूची वाहतूक कधी करता येईल ? | **जिल्हा खनिकर्म अधिकारी** – पर्यावरणाची अनुमती मिळाल्यानंतर सदरच्या वाळूघाटाचे लिलाव करण्यात येईल. लिलावधारकाने वाळू घाट ताब्यात घेतल्यानंतर वाळू उपसा करुन वाहतूक करण्यात येईल. अंदाजे सप्टेंबर २०२१ पर्यंत वाळू घाटांचा लिलाव होईल. |
| ६ | **श्री. विकास नवाळे, मुख्याधिकारी, भडगांव नगरपालिका** – वाळू घाटाजवळ पाणीपुरवठा विहिर असून सदरच्या वाळू घाटासाठी अंतराचे थोडा विचार करण्यात यावा, हि विनंती. | **जिल्हा खनिकर्म अधिकारी** – नविन वाळू धोरणानुसार उप तांत्रिक समिती वाळू घाटापासून सार्वजनिक पाणवठा / पाणीपुरवठा विहिर, रेल्वे पुल व रस्ते पुल इत्यादीबाबींची पडताळणी करुन प्रमाणपत्र देण्यात येते व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येते. |
| ७ | **श्री. कैलास चावडे, तहसिलदार, पाचोरा** – मौजे परधाडे गावालगत वाळू घाट हा शासकीय कामांसाठीच राखीव ठेवण्यात आलेला आहे. | **जिल्हा खनिकर्म अधिकारी** – शासकीय विभागांच्या कामांसाठी वाळूची मागणी असले तरच सदरचा वाळू घाट हा लिलाव करण्यात येईल.<br>नगरपालिकेच्या व आसपासच्या शासकीय विभागांना कळविण्यात आलेल्या असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर आपणास कळविण्यात येईल. |
| ८ | **श्री. शशिकांत पाटील, सरपंच, परधाडे** - मौजे परधाडे गावाजवळील वाळू ठेका हा शासकीय कामासाठी न देता तो सार्वजनिक देण्यात यावा. त्यानुसार ग्रामपंचायतने शासकीय कामासाठी ठराव करुन दिलेला असून तो सार्वजनिक बदलून देता येऊ शकेल का ? | **जिल्हा खनिकर्म अधिकारी** – देता येईल. |
| ९ | **श्री. विकास नवाळे, मुख्याधिकारी, भडगांव नगरपालिका** – नवीन धोरणानुसार १५ ते २० % रक्कम लवकरात लवकर मिळावी ही विनंती. | **जिल्हा खनिकर्म अधिकारी** – मौजे वडधे येथील वाळू घाट हा यशस्वीरित्या लिलाव झाल्यास आपण त्याबाबतची रक्कम नवीन धोरणानुसार देण्यात येईल. |

श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ व श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सर्व सहभागी नागरिकांना आवाहन केले की अजून कुणास आपले मत मांडावयाचे असल्यास ते मांडू शकतात. त्यानंतर कुणीही आपले म्हणणे मांडावयास पुढे आले नाही.

श्री. सो. म. कुरमुडे यांनी नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्द्याची नोंद घेण्यात आली असल्याचे सांगितले. त्यानंतर मा. अध्यक्ष्यांच्या परवानगीने त्यांनी सर्वांचे आभार मानून जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(सो. म. कुरमुडे)**<br>समन्वयक<br>तथा<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>जळगांव | **(डॉ. प्रविण जोशी)**<br>सदस्य<br>तथा<br>प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>नाशिक | **(अभिजित राऊत) भा.प्र.से.**<br>अध्यक्ष<br>तथा<br>जिल्हादंडाधिकारी, जळगांव |